कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे "कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग" असे नामकरण करणेबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२०/प्र.क्र.९९/प्रशा-१**
२ रा मजला (मुख्य), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२२

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एईओ-१०१५/प्र.क्र.६/२०१५/१०, दिनांक १५ जानेवारी, २०१५ (पृ.१/प.वि.)
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०१५/ प्र.क्र.१९०/प्रशा-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ (पृ.३-७/प.वि.)
३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०२०/ प्र.क्र.९९/प्रशा-१, दिनांक २९ सप्टेंबर, २०२० (पृ.१०५/प.वि.)
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.शाकानि-२०१९/प्र.क्र.६५/१८(रवका), दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ (पृ.१९/प.वि.)

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात सन १९९७ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या "रोजगार व स्वयंरोजगार" या विभागाचे नामकरण, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.१५ जानेवारी,२०१५ च्या शासन निर्णयान्वये " कौशल्य विकास व उद्योजकता" असे करण्यात आले आहे. तथापि या नामकरणामध्ये "रोजगार" या शब्दाचा उल्लेख नसल्याने तसेच, रोजगार व स्वयंरोजगाराशी संबंधित कोणता विभाग असेल याबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये याकरीता संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २९.०९.२०२० च्या शासन निर्णयान्वये विभागाचे "कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग" असे नामकरण करण्यात आले आहे.

विकसित आधुनिक तंत्रज्ञान व काळानुरुप कौशल्य प्रशिक्षण देणे, रोजगारासह उद्योजकतेस प्रोत्साहन देणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्रातील स्टार्टअप्स तसेच, नवसंकल्पना आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाने महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण दि. ०५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केले असून या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी कार्यरत आहे.

'नाविन्यता' या संकल्पनेत कालानुरुप नवतंत्रज्ञान, त्यानुरुप कौशल्य, उद्योग, उद्यमशील नवकल्पनेस प्रत्यक्ष व्यावहारिक मूर्त स्वरुपात अंमल करण्यास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने विभागामार्फत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. नाविन्यता ही संकल्पना सर्वसामान्यांपर्यंत माहीत व्हावी व याची

जबाबदारी ही नेमक्या कोणत्या विभागाकडे आहे, हे सर्वांना स्पष्ट व्हावे या हेतूने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत, विभागाच्या नावात नाविन्यता हा शब्द समाविष्ट करुन विभागाचे नाव "कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग" (Department of Skills, Employment, Entrepreneurship & Innovation) असे सुधारित नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयास अनुसरुन विभागाच्या नावातील बदलाबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य मंत्रीमंडळाच्या, बुधवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन,

***"कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता" ("Skill Development, Employment and Entrepreneurship") विभागाचे***

***"कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग" ("Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department")*** असे नामकरण करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ च्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचना प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करावी.

तसेच, वित्त व नियोजन विभागाने आगामी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये प्रसिद्ध करावयाच्या विविध प्रकाशनांमध्ये विभागाच्या सुधारित नामाचा समावेश करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०२२५१५२९५२९५०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Varsha Munja Bharose
Date: 2022.03.04 14:15:08 +05'30'

**( वर्षा मुं. भरोसे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर
३. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधान सभा, विधान भवन, मुंबई
६. सभापती, महाराष्ट्र राज्य विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र राज्य विधान सभा/विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८. सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य
९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१०. मुख्य सचिव यांचे कार्यालय
११. अपर मुख्य सचिव )सेवा/सचिव (र. व का.), सामान्य प्रशासन विभाग
१२. प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
१३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
१४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई
१७. सर्व मंत्रालयीन विभाग
१८. सर्व विभागीय आयुक्त
१९. सर्व जिल्हाधिकारी
२०. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
२१. निवड नस्ती (प्रशा-१).